वर्ष २१
अंक २ रा
आगस्ट १९४७

# समाजस्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे.
एम्.ए.

किंमत
४
आणे

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ प्रचलित कामनीति-२ ... ... ... | २३ |
| २ आचार्यांनी तोडलेले तारे ... ... ... | २८ |
| ३ ग्रंथपरीक्षण ... ... ... ... | ३३ |
| ४ पत्रव्यवहार ... ... ... ... | ३४ |
| ५ शारदेचें पत्र ... ... ... ... | ४० |
| ६ फ्रेंच शाळांत लैंगिक शिक्षण ... ... ... | ४५ |



## अेजंटांचीं नांवें

मुंबई : श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

पुणें : अल्. के. जोशी, बुकसेलर

कोल्हापूर: स्कूल अॅन्ड कॉलेज बुकस्टॉल.

बेळगांव: जे. एम्. माणूरकर, खडे बाजार.

अहमदनगर: पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

मडगांव, गोवा: मा. पं. रायकर

निपाणी : के. एस्. बळगुर्गी

ग्वाल्हेर : डोके ब्रदर्स, लष्कर.

कुमठा : आर्. एम्. कामत

नागपूर : सी. सी. ताठे, नवयुग न्यूज अेजन्सी.

गोकाक : पी. एम्. शिरगांवकर

सांगली : त्रिवेणी बर्वे अॅंड सन्स



**वार्षिक वर्गणी :** मनीआर्डरीने तीन रुपये, व्ही. पी. ने सवातीन.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# प्रचलित कामनीति—२

कामेंद्रियांवर घातलेल्या बहिष्काराचें आणखी अेक कारण असें सांगतात कीं विनयानें किंवा लज्जेने मनुष्य आपलीं कामेंद्रियें झांकून ठेवतो, इतकेंच नव्हे तर कामेच्छा सुद्धां दिसू देत नाहीं. कित्येक धर्मांत स्वतःचें अिंद्रिय देखील पाहण्यास मनाअी आहे, तेव्हां त्या धर्मांतल्या लोकांना स्वतःची सुद्धां लाज वाटते काय? ही लाज किंवा विनय देखील कृत्रिम आहे हें उघड आहे आणि सुधारलेल्या समाजांत या विनयाची मर्यादा येथपर्यंत पोंचली आहे की तिच्या पायीं विनयभंग नांवाचा अेक नवीन गुन्हा निर्माण झाला आहे! विनय नैसर्गिक असता तर तो प्राचीनांना देखील माहीत असता. ग्रीसच्या उदाहरणांवरून तसें दिसत नाहीं. तसेंच मनुष्याशिवाय कोणत्याही प्राण्याला तो माहीत नाही. ते खुशाल रस्त्यांत देखील नागवे हिंडतात आणि माणसांना देखील त्यांत कांहीं चमत्कारिक वाटत नाही.

विनय नैसर्गिक नाही म्हणूनच लहान मुलांना तो माहीत नसतो. कामेंद्रियांना हात लावूं नये, किंवा तीं उघडी टाकूं नये, हें त्यांना वारंवार सांगावें तरी त्यांना उमज पडत नाही, उलट तीं दाखवण्यांतच त्यांना गंमत वाटते, हें फ्रॉअिडने लिहिलें आहे आणि सर्वांना माहीत आहे. शिक्षा होअील या भीतीनेच शेवटीं मुलें तीं झांकूं लागतात, पण मोठीं माणसें नसतील तेव्हां मुलें अेकमेकांना हीं अिंद्रियें दाखवतात आणि त्यांना स्पर्शही करतात. हें चोरून करावें लागत असल्यामुळें त्यांत त्यांना अधिकच आनंद वाटतो. समाजाला पाहिजे असलेला विनय त्यांच्या अंगीं मुरायला बरींच वर्षे लागतात

आणि कांहींना तर तो शेवटपर्यंत जुलूम वाटतो, आणि केवळ नाअिलाज म्हणूनच तीं तो सहन करतात. लहान मुलांप्रमाणेंच प्राथमिक लोकांना देखील विनय माहीत नसतो, अितकेंच नव्हे तर प्राथमिक न गणलेल्या जपानांत देखील अगदी अलीकडेपर्यंत कामेंद्रियें झांकण्यांत कांही विनय असतो हें माहीत नव्हतें.

स्त्रियांना विनय पुरुषांपेक्षा जास्त असतो, आणि निदान त्यांच्या बाबतींत तो नैसर्गिक असतो असें कित्येकांना वाटतें, पण ते सर्वस्वी खोटें आहे. जगांत वेश्यांची संख्या कोटींनी मोजावी लागेल आणि त्यांना अेकामागून अेक अनेक पुरुषांदेखत नग्न होण्यास बिलकुल लाज वाटत नाही, अितकेंच नव्हे तर अनेकांसमोर नग्न नृत्य करायला देखील कांहीं स्त्रिया तयार होतात. वेश्यांची संख्या अितकी मोठी आहे की त्यांना अपवाद म्हणतां येणार नाही. बरें, वेश्या सोडल्या तरी विवाहबाह्य समागम अनेक पुरुषांशीं करणाऱ्या स्त्रिया कांही कमी नसतात. तेव्हां स्त्रियांची लाज देखील समाजाच्या भीतीनेच उत्पन्न झालेली असते आणि तीही सांकेतिकच समजली पाहिजे.

आणि हाच समाज विवाहित स्त्रियांच्या मात्र विनयभंगाला परवानगी देतो आणि स्त्रियांनाही त्यांत मोठें संकट वाटतें असें नाही, कारण या सामाजिक संकेताला कितीहि मान देणारी स्त्री असली, तरी ती विवाहाला उत्सुक असते. पूर्वी जीं अिंद्रियें दिसूं देण्याची किंवा त्यांच्याबद्दल बोलण्याची मनाअी होती, तीं विवाहानंतर दाखवण्याची आणि त्यांचा उपयोगहि करण्याची मुभा मिळते. विनय जर नैसर्गिक असता, तर स्त्रियांनी विवाहाला विरोध केला असता, पण तसें बिलकुल दिसत नाही. नवराबायकोंत असल्या विनयाला जागाच रहात नाहीं आणि तो नाहींसा झाल्याबद्दल त्यांना मोठेंसें वाअीट वाटतें असें दिसत नाही. कोणी म्हणेल की हा विनय अेका माणसापुरताच नाहीसा होतो, पतिपत्नींना अितरांशीं विनयानें वागावें लागतेंच. पण अेक मेल्यावर दुसरी बायको किंवा नवरा करण्याची परवानगी नसते. वेश्यांना सर्वच पुरुषांशी वागतांना विनय सोडावा लागतो आणि त्यांत त्यांना वाअीट

वाटत नाही. विवाहित स्त्रियांना अेका वेळीं अेकाच पुरुषाशीं विनय सोड-ण्याचीं परवानगी असते, पण तो मेला तर दुसरा, आणि वेळ पडली तर तिसराही नवरा करण्याची मनाई नसते.

अश्लीलता असें जर कांहीं असेल, तर पतिपत्नींना अेकमेकांशीं आणि वेश्यांना सर्व गिऱ्हाअिकांशीं अश्लीलतेचा कळस करण्याची परवा-नगी असते, नव्हे अश्लील वागणूक हें त्यांचें कर्तव्यच असतें. पुरुष पुष्कळ वेळां स्त्रियांच्या विनयाची स्तुति करतात, पण ती कशाकरितां ? तर आपल्या पत्नीनें इतरांशीं विनयाने वागावें म्हणून. ती जितकी अधिक विनयाने वागेल, तितकी पत्नीच्या व्यभिचाराची भीति कमी होते, आणि शिवाय ती जितका अधिक विनय दाखवील, त्या मानाने अेकांतांत तिचा विनयभंग करण्यांत अधिक स्वारस्य उत्पन्न होतें. स्त्रीचा विनय हा कामवासनेला उत्तेजकच असतो, असें 'कार्डिनल रिश्लिय' याने म्हटलें आहे, त्याचा अर्थ हाच. जे विनयाला फारसें महत्व देत नाहीत, ते विनयशील स्त्रियांच्या नादीं लागत नाहीत. जी स्त्री चटकन् कबूल होअील, तीच त्यांना पाहिजे असते.

अेका फ्रेंच लेखकाने लिहिलें आहे की विनय म्हणजे दडपलेल्या काम-वासनेची पताका आहे. लहान मुलांना कामवासनाच नसते. किंवा निदान ती वेगळया प्रकारची असते, तेव्हां त्यांना विनय बिलकूल नसतो. पुढें कामवासना उत्पन्न झाल्यावर ती नैसर्गिक रीतीने तृप्त करण्याची परवानगी नसते आणि या वेळेपासूनच विनय त्यांच्यावर लादला जातो. हें काम आअी-बाप करतात, म्हणूनच मोठेपणीं ज्यांना कामविषयक बाबतींत लज्जा बिल-कुल वाटत नाहीं, त्यांना देखील आअीबापांची लाज वाटते. अितर कोणीही नग्न पाहिलें तरी ज्यांना कांहीं वाटत नाही, त्यांना आअीबापांनीं मात्र तसें पाहतां कामा नये असें वाटतें. दुसऱ्या कोणीं आपल्या आअी-बापांच्या देखत अेखादा 'अश्लील' हा शब्द उच्चारला, तरी त्यांना कसें-सेंच होतें. ही लज्जा किंवा विनय अस्थानीं आहेत, असें जरी त्यांनी कितीही विचारपूर्वक ठरवलें असलें, आणि त्याप्रमाणें ते वागत असले, तरी

आईबापांसमोर त्यांना लाज वाटतेच, कारण त्यांनींच ती प्रथम मारून मुटकून शिकवलेली असते आणि हे लहानपणचे संस्कार जन्मभर सुटत नाहीत.

अर्थातच या विनयाचे दंडक देशकालमानाने बदलतात यांत आश्चर्य नाहीं. शरीराचे जे भाग झांकले पाहिजेत असा अेके ठिकाणीं निर्बंध असतो, तेच झांकतां नये अशी चाल अितरत्र सांपडते. अितकेंच काय, पण अेकाच देशांत हे दंडक घड्याळाप्रमाणे बदलतात. अिंग्लंडांत सकाळच्या वेळीं नदींत पोहणारे पुरुष नग्नच असले पाहिजेत अशी चाल आहे. अशा ठिकाणीं अितर विद्यार्थ्यांबरोबर गेलेला अेखादा हिंदी विद्यार्थी नग्न होण्यास लाजूं लागला, तर स्थानिक विद्यार्थी त्याला हंसतात आणि चिडवतात. अर्थात् त्याला नग्न होणें भाग पडतें. अितक्या लवकर स्त्रियांनीं तेथें जाऊं नये असाही दंडक असतो, आणि घरांत देखील अपुरा पोशाख केलेला पुरुष स्त्रीच्या दृष्टीस पडतां नये, असा दंडक असे, पण पोशाखासंबंधी दंडक अिंग्लंडांतही अलीकडे बरेच ढिले झाले आहेत.

तेव्हां हे दंडक नैसर्गिक विनयामुळें किंवा लज्जेमुळें उत्पन्न होत नाहीत, ते केवळ सांकेतिक असतात, हें उघड आहे. ते कसे उत्पन्न होतात याचें कारण शोधण्याकरतां जास्त खोल विचार केला पाहिजे.

जास्त विचार केला असतां असें दिसतें की अशा प्रकारचे संकेत आध्यात्मिक कल्पनांपासून उत्पन्न झालेले आहेत. ब्रह्मचर्याचा पुरस्कार करणाऱ्या सर्व धर्मांतील मुख्य कल्पना अशी असते की जग हें नश्वर आहे, मनुष्याचें या जगांतील आयुष्य फारसें महत्वाचे नाही, पण मेल्यावर त्याचें काय होईल याला मात्र अतिशय महत्व आहे, तेव्हां या आयुष्याचा उपयोग पुढची तयारी करण्याकडे केला पाहिजे. याच्याबरोबर अर्थातच ओघानेच अशी कल्पना येते की या जगांत मनुष्याचे जितके हाल होतील तितका मरणानंतरचा काल अधिक सुखावह होईल. ते हाल आपोआप न झाले तर मुद्दाम करून घेतले पाहिजेत म्हणून उपोषण, ब्रह्मचर्य, एका पायावर उभें

राहून तपश्चर्या करणें, फटके मारून घेणें, वगैरे कृत्यांनी पुण्य लागतें, म्हणजे मरणानंतर मिळणाऱ्या सुखावर हक्क उत्पन्न होतो. मद्य प्याल्याने मनुष्याला सुख होतें, म्हणून दारूबंदी केल्याने पुण्य लागतें. धार्मिक लोकांची प्रवृत्ति सर्व सुखांच्या विरुद्ध असते. नाट्य, नृत्य, संगीत, यांची आवड म्हणजे देखील त्यांच्या मताने व्यसनेंच ठरतात. क्रिस्ती धर्मांत विवाहाला, म्हणजे कामतृप्तीला परवानगी याच तत्त्वावर दिली आहे की कितीही बंदी केली तरी मनुष्य कामतृप्तीशिवाय राहणार नाही, तेव्हां मर्यादित कामतृप्तीला परवानगी दिल्याने त्याला कमी पाप लागेल. ( नरकांतील अग्नीने ) जळण्यापेक्षा विवाह करणें बरें, असें सेंट पॉलचें वचन प्रसिद्ध आहे. जगांतील सुख शक्य तितकें कमी करावें, या धार्मिक प्रवृत्तीच्या पायींच कामवासनेला पायबंद घालण्याचे प्रयत्न झाले आहेत, आणि त्याचा एक उपाय म्हणजे कामेंद्रियें घाणेरडीं आहेत, त्यांसंबंधी बोलणें देखील पाप आहे, तेव्हां तीं झांकून टाकलेली बरीं असें पुकारणें. त्यांचा उपयोग केल्याशिवाय मनुष्य राहणारच नाही, म्हणून निदान धर्माची परवानगी घेऊन तो उपयोग करावा, म्हणूनच लग्न हा धार्मिक विधि मानलेला आहे. दारूचें किंवा अफूचें व्यसन असलेल्या मनुष्याला थोडीबहुत दारू किंवा अफू दिल्याने तो बेतांत राहतो, तशाच प्रकारचा हा विचार आहे. कामतृप्तीच्या सुखाची दुसऱ्या कोणत्याही सुखाशीं तुलनाच होऊं शकत नाही, म्हणूनच धार्मिक लोक या सुखाविरुद्ध दांतओठ खातात. घाण, लज्जा, विनय, वगैरे सर्व या कल्पनेच्या अनुषंगाने आलेलीं आहेत. पण कामेंद्रियें घाणेरडीं असलीं तर विवाहाने तीं स्वच्छ होत नाहीत, समागम लज्जास्पद असला तर विवाहाने तो स्तुतीला पात्र होत नाही, हीं इंद्रियें दिसल्याने विनयभंग होत असला, तर तो विवाहितांचे समागमांत देखील झालाच पाहिजे. हें शेवटचें तत्त्व मात्र कांहीं लोक मान्य करतात, कारण समागमाचे वेळीं देखील विवस्त्र होऊं नये, तेवढ्यापुरतीं छिद्रें कपड्यांत असावीं, असें म्हणणारा एक क्रिस्ती पंथ आहेच.

अर्थात् बंदी फक्त संभोगसुखाला आहे, प्रजोत्पत्तीला नाही. म्हणजे

या दोन गोष्टी वेगळ्या आहेत असें जें वर म्हटलें आहे, तें धार्मिक लोकांना मान्यच असतें. खरें म्हटलें तर घाणीलाही या लोकांची हरकत नसते, त्यांची हरकत असते ती सुखाला. याचा पुरावा म्हणजे ब्रुसेल्स शहरांत एका सार्वजनिक ठिकाणीं असलेल्या कारंजांत लहान मुलाचा पुतळा असून कारंजांत पडणारें पाणी मुलाच्या जननेंद्रियांतून येतांना दिसतें. याची कोणाला लाज वाटत नाही आणि या पुतळ्याच्या हुबेहुब नकला बाजारांत विकत मिळतात.

---

# आचार्यांनी तोडलेले तारे

जुलै २० व २१ रोजीं वामनराव जोशांच्या स्मृतिदिनाकरतां व साहित्य-संघदिनाकरतां या वर्षी जे दोन वक्ते बोलावले होते–आचार्य भागवत आणि श्री. आ. रा. देशपांडे, उर्फ कवि अनिल–त्या दोघांनीही अध्यात्मज्ञानाची महति सांगितली. पैकी दुसऱ्या वक्त्याविषयीं विशेष विवेचन करण्याचें कारण नाही. त्यांनी केलेल्या भाषणांत बराच अर्थ होता, परंतु सर्व भारतीय कलांच्या पुनरुज्जीवनाकरतां त्यांनी अध्यात्मज्ञानावर जो भर दिला, त्यांत मात्र आमचा मतभेद आहे. त्यांनी स्वतःच असें स्पष्ट सांगितलें की आत्मा कोठे असला तर तो शरीरांतच असला पाहिजे, तो वेगळा असूं शकत नाही. अध्यात्मज्ञानाची उभारणी आत्म्याच्या वेगळ्या अस्तित्वावर केलेली आहे, तेव्हां त्याचा मूळ पायाच जर काढून टाकला तर शिल्लक काय राहिलें? या बाबतींत या कवींनी भाषेची बरीच निरर्थक कसरत केली, या पलीकडे त्यांतून अर्थ निघत नाही. शिवाय कलांच्या बाबतींत त्यांनी जें सांगितलें की सामान्यांच्या मताला त्यांत किंमत नाही, फक्त तज्ञांच्या मतालाच आहे, तेंही आम्हाला कबूल नाही. तज्ञांच्या मताला तुम्ही खुशाल किंमत द्या, पण अेखाद्या सामान्य माणसाला जर सांगितलें की ही वस्तु तुला सुंदर दिसत नसेल पण तज्ञांना ती सुंदर वाटते, तेव्हां ती सुंदर असलीच पाहिजे, तर आमच्यासारखा मनुष्य कधीही कबूल करणार नाही. सौंदर्याची कोणतीही व्याख्या

करणें अशक्य आहे, इतकेंच नव्हे तर तज्ञांचीं मतें देखील कसकशीं बदलत जातात हें पाहिलें म्हणजे त्यांच्या मताला फारशी किंमत रहात नाही. अेका युगांत जें सुंदर दिसतें, तें पुढील युगांत दिसत नाही, आणि त्यापुढील युगांत तें तज्ञांना पुन्हा सुंदर दिसूं लागतें. अशा स्थितींत तज्ञ म्हणतात म्हणून अमुक वस्तु सुंदर, असें न म्हणतां जें आपल्याला सुंदर दिसेल तेंच सुंदर, असाच निष्कर्ष काढणें भाग आहे. गाणारा कितीही कुशल आणि तज्ञ असला, तरी जोंपर्यंत त्याचें गाणें ऐकून सामान्य माणसांना कंटाळा येतो, तोंपर्यंत त्याच्या गाण्याची तारीफ सामान्य माणसांनी कां करावी? सामान्यांच्या मनाची वाढ झालेली नसते असें म्हणतां येअील, पण तज्ञांची मतें जेथे हेलकावे खातात, तेथे त्यांच्या मनाच्या वाढीचा पुरावा काय?

आचार्य भागवतांनी सांपडलेल्या संधीचा फायदा घेऊन त्यांच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणें वेळींअवेळीं गांधींचा व कांग्रेसचा मोठेपणा, आम्ही कांग्रेसवाल्यांनी जे असामान्य पराक्रम केले, त्यांमुळेंच कांग्रेसला जनतेचा पाठिंबा आहे, वगैरे गोष्टी सांगितल्या आणि वामनरावही अेकदां तुरुंगांत जाऊन आलेले असल्यामुळे तो विषय ओघानेंच आला. तथापि त्यांनी आपल्या प्रवचनांत जीं अनेक खोटीं विधानें ठोकून दिलीं (कदाचित् त्यांच्या मतानें तीं खरींही असतील, तथापि तेवढ्यानें तीं खरीं होत नाहीत, कारण 'वाचमर्थोऽनुधावति' अितका आचार्यांचा प्रभाव दिसत नाही), त्यांचा परामर्श घेणें जरूर आहे.

पहिलें विधान त्यांनी सुरवातीलाच केलें, की आगरकरांच्या नंतर जर कोणी बुद्धिवादाचा हिरीरीने पुरस्कार केला असेल, तर तो वामनरावांनी. वामनराव फारसे बुद्धिवादी नव्हते, हें आम्ही अनेक वेळां सिद्ध केलें आहे आणि खुद्द भागवतांनीही शेवटीं असेंच सांगितलें की वामनराव वाटतात तितके नास्तिक नव्हते. येथे घमेंडखोरपणाचा आरोप येण्याचा संभव स्पष्ट दिसून देखील हें स्पष्ट सांगणें जरूर आहे की आगरकरांच्या मागें मराठींत जर कोणी बुद्धिवादाचा पुरस्कार हिरीरीनें केला असेल, तर तो आम्हीच केला

आहे, दुसऱ्या कोणत्याही लेखकानें केलेला आमच्या आढळांत नाही. बुद्धिवाद हा केवळ नास्तिकवादापुरताच नसून ज्यांना बुद्धिप्रामाण्य पटत असेल त्यांनी ही पद्धति प्रत्येक विषयाला लावली पाहिजे आणि तशी आम्ही लावून दाखवली आहे.

कांहीतरी करून बुद्धिवाद्यांचा कमीपणा दाखवण्याकरतां असा आरोप पुष्कळ वेळां करण्यांत येतो की बुद्धिवाद्यांना भावना कळत नाहीत. हा आरोप अत्यंत हास्यास्पद आहे. आपल्याला भावना कळत असल्यामुळें आपण बुद्धिवाद्यांपेक्षा श्रेष्ठ, असें दाखवण्याकरतां हा खटाटोप असतो. आपल्या बापाचे तुकडे करावे असें बुद्धिवादानें ठरलें, तर बापाला कापावा काय, असा सवाल भागवतांनी टाकला. कापावा असें बुद्धिवादी मनुष्य देखील म्हणणार नाही, कारण भावनांचें महत्व बुद्धिवाद्यांनाही कळतें. अितकेंच काय पण मनुष्याची वागणूक बहुतेक वेळां बुद्धिवादावर अवलंबून नसतेच आणि असणें शक्य नाहीं. ती अंतःप्रेरणेवर अवलंबते आणि या अंतःप्रेरणा कोठून येतात याचें विवेचन फ्रॉअिडसारख्या लेखकांनी केलें आहे. फ्रॉअिडचें म्हणणें सर्वस्वी कबूल न केलें, तरी त्यानें या अंतःप्रेरणांसंबंधी बरीच गुपितें बाहेर काढलीं आहेत यांत शंका नाही. फ्रॉअिडचा विचार केल्याशिवाय देखील अेक साधें उदाहरण देतां येअील. मनुष्याने निर्भय असावें, आपण भय दिसूं न देतां वाघाकडे टक लावून पहात राहिलों तर वाघ देखील अंगावर यायला धजत नाही, हें वाचलें असलें आणि पटलें असलें तरी प्रत्यक्ष वाघ समोर आल्यावर मनुष्य पळून गेला तर तो त्याचा दोष नव्हे, हें बुद्धिवाद्यांना देखील कळतें. पण जेव्हां तर्कशुद्ध विचाराने अेखादी गोष्ट सिद्ध किंवा असिद्ध करायाची असेल तेव्हां भावनांचा उपयोग नसतो, तेथे बुद्धिवादच लागतो.

वामनरावांनी जिज्ञासु म्हणून कांहीं शंका विचारल्या आहेत, त्यांचें उत्तर धर्माभिमान्यांना देतां येत नाही, असें आचार्यांनी सांगितलें, पण ही बुद्धिवादाची सरशी आहे हें त्यांना अर्थातच कबूल करणें शक्य नव्हतें. बुद्धीला पटेल असें उत्तर देतां आलें नाही, तरी त्या शंकांना उत्तर आहे

आणि तें अनुभवांतून निघतें असें त्यांनी सांगितलें. बुद्धिवाद्यांचें म्हणणें यापेक्षा जास्त नाही. अनुभवाचा उपयोग ज्याचा त्याला. मला ओश्वराचा साक्षात्कार झाला, असें अेखाद्यानें सांगितलें तरी त्याने दुसऱ्याची खात्री कशी व्हावी ? किंवा त्याचा साक्षात्कार स्वप्नाप्रमाणें खोटा नसेल कशावरून ? अनुभव सार्वत्रिक असल्याशिवाय तो विश्वासार्ह नाही, अितकेंच बुद्धिवाद्यांचें म्हणणें असतें.

बुद्धिवाद्यांची भूमिकाच आचार्यांना कळलेली दिसत नाही. बुद्धीने सर्व प्रश्न सुटतात, किंवा केवळ बुद्धीच्या जोरावर सर्व ज्ञान मिळून मनुष्याला पूर्णता येते, अशीं आचरट विधानें कोणताही बुद्धिवादी मनुष्य करीत नाही, तेव्हां अशीं विधानें गृहीत धरून खोडून काढण्यांत काय फायदा ? शास्त्रीय ज्ञान केवळ बुद्धीवर आधारलेलें नसतें. उष्णता अमुक मर्यादेपेक्षा कमी झाली तर पाणी गोठतें, ही सर्वमान्य गोष्ट बुद्धीने सिद्ध करतां येणार नाही. शास्त्रीय ज्ञानाला अनुभवाची आणि अवलोकनाची जोड लागते, पण तो अनुभव स्वप्नासारखा खाजगी असतां नये, कोणालाही घेतां येअील असा तो अनुभव पाहिजे साक्षात्कारासारखा अनुभव अशा प्रकारचा नसतो, तेव्हां बुद्धिवादी त्याचा विचार करीत नाहीत. भावना मधें आणल्यास तर्कशुद्ध विचार अशक्य असतो, म्हणूनच जेव्हां तर्कशुद्ध विचार करायचा असेल, तेव्हां बुद्धिवादी मनुष्य भावना मधें येऊं देत नाही. वागणुकीचा विचार करतांना मात्र भावनांचा विचार न करून भागत नाही.

बुद्धिवाद्यांना देखील कांही गोष्टी गृहीत धराव्याच लागतात, मग श्रद्धा ठेवली तर काय बिघडलें, असें आचार्य विचारतात. श्रद्धेंत आणि अशा गृहीत गोष्टींत मूलभूत फरक आहे, ही गोष्ट आचार्यांच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं. समाजाच्या कल्याणाची तळमळ वामनरावांसारख्या अर्धवट बुद्धिवाद्यांनाच नव्हे, तर आमच्यासारख्या पक्क्या बुद्धिवाद्यांनाही असते, त्यांच्यापेक्षांही जास्त असते. समाजाचें कल्याणच कशाला व्हायला पाहिजे, अकल्याण झालें तर काय बिघडलें, असें विचारलें तर बुद्धिवाद्यांनाही तें

तर्कानें सिद्ध करतां येणार नाही, तें गृहीतच धरलें पाहिजे. हें जर तुम्ही तर्काशिवाय मानतां, तरमग ओश्वरावर श्रद्धा ठेवायला काय हरकत आहे, हा प्रश्न मात्र आचरटपणाचा आहे. आपलें ध्येय काय असावें, हें तर्कशास्त्राला ठरवतां येत नाही म्हणून ओश्वराचें अस्तित्व मानावें, याला कांही अर्थच नाहीं.

त्यांनी सांगितलेली वैदिकांची श्रद्धा मूर्खपणाची आहे. वेदांतांत कांही न पटण्यासारखें सांगितलें असलें, तर तें चूक न मानतां आपल्या बुद्धींतच कांहीं कमतरता असली पाहिजे, असें मानून ती न पटणारी गोष्ट खरी ठरवण्याच्या खटपटीला लागायचें, हा आचरटपणा आहे, कारण वेदांत खरा मानण्यास कोणतेंही कारण नाही. त्यावर श्रद्धा कां ठेवायची ? वेद ओश्वरप्रणीत आहेत असें मानणें म्हणजे निष्कारण श्रद्धाच आहे. वेद ओश्वराने नसले तरी आमच्या पूर्वजांनीं लिहिले आहेत, आणि पूर्वजांना आमच्यापेक्षां जास्त अक्कल होती, असें गृहीत धरणें हाही आचरटपणाच आहे. पूर्वजांना जास्त अक्कल होती असें मानण्याचा अंतिम निष्कर्ष म्हणजे ज्या वानरां-पासून माणसें झालीं, त्यांना माणसांपेक्षां जास्त अक्कल होतीं असें मानावें लागेल. अर्थात् ज्यांना उत्क्रांतिवादच कबूल करायचा नसेल, त्यांच्याशीं आधुनिक माणसांनीं वाद करण्यांतच अर्थ नाही.

बुद्धिवाद त्यांना पसंत नसल्यामुळें आचार्यांनीं जो बुद्धिवाद्यांवर शिंतोडा उडवण्याचा जो प्रयत्न केला, तो अत्यंत हास्यास्पद आहे. मिलचे ग्रंथ आगरकरांना वाचायला मिळाले नसते तर त्यांची त्रेधा झाली असती, असें त्यांनीं जातां जातां सांगितलें. याचा अर्थ असा कीं आगरकरांची सगळी विद्वत्ता मिलकडून उसनी घेतलेली होती, त्यांचे स्वतःचें भांडवल म्हणण्यासारखें नव्हतेंच. आचार्य भागवतांचें ज्ञान त्यांना कोठून मिळालें ? त्यांनीहि अिंग्रजी ग्रंथ वाचले आहेतच, पण ते त्यांचा पुरस्कार न करतां वेदांचा करतात, हाच त्यांचा मोठेपणा असावा ! यांतून आणखी एक ध्वनि निघतो की संशयवाद आणि नास्तिकवाद हे पाश्चात्यांकडून आलेले, आणि म्हणून निकृष्ट आहेत. त्यांनीं उदाहरणें दिलीं ती पाश्चात्यांचींच,

कारण चेष्टा करण्याकरतां तें सोईचें पडतें. पण या गोष्टी आपल्याकडे नव्हत्याच असें नाही. चार्वाक पाश्चात्य नव्हता. 'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः' हें पाश्चात्यांनीं लिहिलेलें नाही. आणि समजा आपल्याकडे नास्तिक नसते, आणि हें सगळें पाश्चात्यांकडूनच आलेलें असतें, तरीही तेव-ढ्यानें तें त्याज्य ठरलें नसतें. जे बुद्धीला पटलें, ते मिळचें म्हणून त्याज्य ठरवायचें काय?

बुद्धिवादाविरूद्ध आणखीही एक आक्षेप आचार्यांनीं घेतला, पण तोहीं खोटाच आहे. ते म्हणाले की बुद्धिवादानें विलासाकडे प्रवृत्ति होण्याचा संभव आहे. पण असा अनुभव मात्र नाहीं. आज बुद्धिवादाबद्दल ज्यांची जगभर प्रसिद्धि झाली आहे, ते विलासी नाहीत. इतकेंच नव्हे तर प्रत्येक धर्मांत जी पापक्षालनाची सोय केलेली असते, तीमुळें धार्मिकांना पाप करण्याची मुभाच मिळते. बुद्धिवाद्यांना आपल्या सामाजिक जबाबदारीची अधिक जाणीव असते असा अनुभव आहे, तेव्हां भलतेच आरोप करून बुद्धिवादाची बदनामी करण्याचा प्रयत्न फोल आहे.

बोलण्याच्या भरांत आपल्या भाषणांतून कांही अर्थ निघतो की नाही याचें भान आचार्यांना रहात नाही. वामनरावांसंबंधी बोलतांना ते म्हणाले, 'त्यांनीं जिज्ञासूचें सोंग आणलें होतें,' आणि नंतर तें सोंग नसून त्यांचा स्वभाव होता असेंही सांगितलें. शिवाय त्यांनीं सोंग व ढोंग यांतला जो फरक सांगितला, तो अजब होता. सोंग हें जाणूनबुजून केलेलें असतें आणि ढोंग तसें नसतें, हें खोटें आहे. जें जाणूनबुजून केलेलें नसेल, त्याला ढोंग म्हणतां येत नाहीं. हा गोंधळ विद्वान वक्त्यांना शोभत नाही.

---

## ग्रंथपरीक्षण

१ **अेक होता राजा**. लेखक, राम वा. शेवडे, अेम्. अे., बी. टी.,

मॉटडिप. बालभारत प्रकाशन १ लें, भारत बुकस्टॉल, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर. पृ ३२, किंमत ६ आणे.

या पुस्तकांत एकंदर चार गोष्टी असून शेवटीं 'अभ्यास' या मथळ्यांखाली प्रत्येक गोष्टीवर कांहीं प्रश्न दिले आहेत. अनुक्रमणिका नाहीं व गोष्टींवर क्रमांकही नाहीं. पुस्तकावर रंगीत चित्र आहे आणि आंतही कांहीं चित्रें आहेत. गोष्टी मुलांना आवडण्यासारख्या आहेत. असल्या गोष्टींत जनावरें बोलतात आणि जादूचे चमत्कार होतात, पण मुलें मोठीं झालीं म्हणजे हें सर्व खोटें त्यांना आपोआप कळूं लागतें. पण कांहीं खोट्या समजुती अशा असतात की त्या मोठेपणींही कायम राहण्याचा संभव असतो. अशा कल्पना लहान मुलांच्या गोष्टींत तरी घालाव्या की काय, हा प्रश्न विचारणीय आहे. उदाहरणार्थ, 'मोठी मुंगी' या गोष्टींत हत्तीच्या कानांत मुंगी शिरली तर तो मरतो, म्हणून मुंगी हत्तीपेक्षां मोठी ठरविली आहे. खरोखरच मुंगी कानांत गेल्यास हत्ती मरतो की काय, याबद्दल कांहीं पुरावा असल्यास माहीत नाहीं. कदाचित् लेखकाजवळ पुरावा असेल. परंतु अशा कल्पना पुष्कळ वेळां केवळ अैकींव असतात आणि तशा असल्यास त्या गोष्टींत न घालणें बरें असें वाटतें, कारण अशा कल्पना मोठेपणींही पुराव्याशिवाय कायम राहण्याचा संभव असतो. अेकंदरींत पुस्तक मुलांना आवडेल.

र. धों. कर्वे

---

# पत्रव्यवहार

१

आपलें नवीन पुस्तक 'पॅरिसच्या परी' वाचलें. परदेशांतील समाजांत हलक्या समजल्या जाणाऱ्या व्यक्तींचीं-आणि तीही दोनअडीचशें वर्षांपूर्वीं होऊन गेलेल्या-चरित्रें लिहिलीं जातात, हें वाचून त्यांच्या निरीक्षणाचें व

उद्योगाचें कौतुकच करावेंसें वाटतें. असें वाङ्मय वाचलें म्हणजे आपल्या समाजांत सहज दिसणाऱ्या गोष्टींचेही विचार मनांत येतात व निरीक्षाणाचा दृष्टिकोनही बदलतो. आपल्या देशांतही अशा नमुन्याचीं उदाहरणें अगदीं तंतोतंत न जमलीं तरी कमजास्त मानानें सांपडणें शक्य आहे. परंतु अशा घटनांकडे सुशिक्षित लेखक आणि समाजानिरीक्षक मुद्दाम दुर्लक्ष करीत असतील, मग यावर लेखन करणें तर दूरच. अशापैकीं कांहीं पाहिलेल्या व कांहीं अैकलेल्या गोष्टी अशाः–१. अेका संस्थानिकाचे पत्नीने आपल्या पतीसमक्ष आपल्या प्रेमी स्वयंपाक्याचे प्रेतास मांडीवर घेणें, तात्पुरतें कुंकू पुसणें, हाय मोकलून त्याकरतां रडणें, व त्याचे अंगावर पडणें, वगैरे प्रकार समक्ष पाहिल्याचें लोक सांगतात. २. मोठमोठ्या सरकारी अंमलदारांत मनसोक्त वागून नंतर कुंटीण बनलेल्या अेका स्त्रीनें असिस्टंट कलेक्टरच्या दर्जाच्या मनुष्याच्या मुलीस फुसलावल्याचा दाखला मिळतो. ३. मनसोक्त वागणाऱ्या कालेजकुमारींनीं नांवलौकिक, पैसा आणि उत्तम नवरेही पटकावल्याचें आपल्या अेकण्यांत असेल. कित्येक धनाढ्यांच्या बायका लेखिका, कलावंत, नाटककर्त्या, नटी, वगैरे झाल्याचें आपल्याकडेही दिसतें. ४. पदवी, शिक्षण, रूप, रंग, हें कांहींही नांव घेण्याजोगें नसतां अनेक मोठ्या लोकांस झुलवणाऱ्या स्त्रियांचीं उदाहरणें दिसतात. ५. महाराष्ट्रांत खाणावळी सुरू होणेंचे अमदानींत या धंद्याआड लपून आणि रंगेल मेकअप् करून (कारण पूर्वीच्या खाणावळींच्या मालकिणी विशेषा विधवा असत ) मधुकरवृत्तीने चैन करणाऱ्या स्त्रिया पुष्कळ असत. ६. सिनेमांतील नटींवर उघडच आक्षेप घेतले जातात आणि तरीही त्या प्रतिष्ठितच समजल्या जातात. ७. भरपूर पोटगी मिळणाऱ्या खानदानी घराण्यांतील विधवा कांहीही संबंध नसतां प्रतिष्ठित लोकांचे आश्रयाला राहून त्यांची सामुदायिक रीतीने खानपान-गायन-वादनादि प्रकार एका काळीं होत. त्यांचीं खरीं नांवें नाहींशीं होवून ज्यांचे आश्रयाला त्या असत त्यांचीं आडनांवें त्यांना लागत. हें आमचे पाहण्यांत आहे. असे प्रकार आहेत, तरी त्यांकडे चरित्राच्या किंवा कलेच्या दृष्टीने कोणी पाहिलेंच नाही. आणि जरी

एखाद्याने त्यांचा लेखनाकडे उपयोग केला असता, तरी तें कोणासंबंधी आहे हें समजून लेखकावर जबाबदारी येती. आपला...

उ. आपल्याकडील बऱ्याच सिनेमानटी अमेरिकन नटींच्या पावलावर पाऊल टाकीत आहेत यांत शंका नाही आणि यामुळें त्यांना कोणत्याही प्रकारचा सामाजिक छळ सोसावा लागत नाही, याचें मुख्य कारण त्या आपलें स्वतःचें पोट भरीत असतात आणि कदाचित् इतरांनाही पोशीत असतील. इतर जे प्रकार आपण म्हणतां, ते निःसंशय खरे आहेत, पण अशा स्त्रियांना कोणीही महत्व देत नाही. फ्रान्समधें मनसोक्त वागणाऱ्या स्त्रिया पुष्कळ वेळां सुशिक्षित असत आणि बऱ्याच सुशिक्षित लेखकांची त्यांचेकडे येजा असे, आणि हा सर्व प्रकार उघड असे, त्यांत चोरी नव्हती. इंग्लडांतही हे प्रकार नाहीत असें नाही, पण या बाबतींत इंग्रज लोक ढोंगी असतात, यामुळें ते चोरूनच होतात. आपल्याकडे देखील उघडपणें रखेल्या ठेवणारे लोक गेल्या पिढींत होते, पण इंग्लंडच्या अनुकरणाने आपणही ढोंगी होत आहोंत आणि त्याचा ताजा पुरावा म्हणजे सक्तीच्या एकपत्नीव्रताचा नवीन कायदा. यूरोपच्या मानाने आपण मागसलेले ठरूं, ही भीतीच या कायद्याच्या मुळाशीं आहे यांत शंका नाही. येथे वेश्या समजल्या जाणाऱ्या गोवेकरणी देखील एकाच पुरुषाशीं एकनिष्ठपणें राहण्यांत भूषण मानतात, ही आपल्या सोंवळेपणाची एक बाजू आहे. सं.

२

१. यंदांचे टिळक पंचांगांत अधिक महिना अजीबात नसल्यामुळे व इतर पंचांगांत श्रावण अधिक असल्यामुळे सर्व सण मागेपुढे होऊन शाळेच्या सुट्यांबद्दल ओरड होऊन कांहीजण सुट्या अर्ध्या अर्ध्या द्याव्या म्हणून म्हणत आहेत. अशा सुट्या देणें म्हणजे दोन पंथ निर्माण करणें आहे. तसेंच आर्द्रा नक्षत्र टिळक पंचांगांत गजावर असून जुन्या पंचांगांत मूषकावर आहे. मृग नक्षत्र टिळक पंचांगांत २ जूनला सुरू होतें, जुन्या पंचांगांत ८ जूनला सुरू

होतें. २. हल्ली कांहीं वर्तमानपत्रें तारखेऐवजी दिनांक घालून पुढे इंग्रजी महिन्याचा आंकडा घालतात. तारीख इंग्रजांची असल्यामुळें घेणें नसेल, तरी सर्वांनी कोणतीतरी एकच रीत घेतल्यास बरें होईल असें वाटतें. या बाबतींत आपलें मत सांगितल्यास बरें होईल. आपला, **दत्तात्रय शिवराम चिखले**

उ. १ कोणतेंही काम एकीनें करण्याची पद्धत आपल्याकडे नाही, आणि त्यांतल्या त्यांत टिळक पंचांग हा एक मूर्खपणाचा कळस आहे. जुनें पंचांग चुकलेलें आहे, हें सर्व गणितज्ञांना माहीत आहे आणि त्यांत सुधारणा करण्याकरतां कांही अकलेच्या गड्ड्यांची जी अेक समिति नेमलेली होती, तिने नवीन पंचांग तयार करून त्याला टिळक पंचांग हें नांव देऊन लोकमान्य टिळकांची बदनामी केलेली आहे. वास्तविक त्यांत टिळकांचा कांहींच संबंध नाही. लोकांवर छाप पाडण्याकरतां टिळक पंचांग हें नांव दिलें, पण हें नवें पंचांग देखील चुकलेलेंच आहे. तें ज्योतिषशास्त्राला धरून केलेलें नाही. सुधारणा बेताबेतानें करावी, अेकदम करूं नये, असें तत्व कांही लोक सांगत असतात. म्हणजे मुलींची लग्नें फार लहानपणीं होत असत, ती चाल बदलण्याकरतां एकदम १६ वर्षांची मर्यादा न घालतां बाराच वर्षांची घालावी, ती नंतर वाढवतां येईल, हें जसें कांही लोक सांगत होते, तसेंच पंचांग दुरुस्त करतांना एकदम सगळ्याच चुका पुऱ्या दुरुस्त करूं नयेत, कांही तशाच ठेवाव्या आणि कांहींत तडजोड करावी, असें म्हणणारे नालायक लोक या समितींत होते. गणितांत तडजोड होऊं शकत नाही, हें कळायला फारशी अक्कल लागत नाही, पण तेवढी देखील या समितीला नव्हती. दोन व तीन यांची बेरीज सात होते, असें कोणी म्हणूं लागला, तर त्याची चूक काढून बेरीज पांच होते असें त्याला एकदम सांगितल्यास अनर्थ होईल, प्रथम तडजोड करून बेरीज सहा होते असें सांगावें, आणि नंतर ती पचल्यावर मग हळूहळू ती खरोखर पांच होते असें सांगितल्यास त्याला धक्का बसणार नाही, अशा मताचे लोक हें काम करीत असल्यामुळे हा टिळक पंचांगाचा

फार्स तयार झाला आहे. समितींत गणितज्ञ नव्हते असें नाहीं, पण गणितांत तडजोड होत नाहीं जसें सरळ सांगण्याइतका त्यांना शास्त्रीय ज्ञानाबद्दल आदर नव्हता. कदाचित् गॅलिलिओसारखा आपलाही खरें बोलल्याबद्दल छळ होईल अशी भीति त्यांना वाटली असावी. अेकंदरींत जुनें पंचांग काय किंवा टिळक पंचांग काय, दोन्ही कुचकामाचीं आहेत. खरें पंचांग हिंदुस्थानांत अजून कोणी केल्याचें अैकिवांत नाही. जुनें पंचांग प्राचीन काळीं जेव्हां प्रथम केलें तेव्हां बरोबर असेल, पण तें बिनचूक, नेहमी लागू होणारें नव्हतें, म्हणजे गणिताच्या दृष्टीने त्यांत दोष होते. ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने बिनचूक अनुमानें अिंग्रजींत ' व्हिटेकर्स आलमनॅक ' नांवाचें जें पुस्तक दरवर्षी प्रसिद्ध होत असतें, त्यांत दिलेलीं असतात आणि सामान्यतः सर्व जगभर तेंच मान्यता पावलेलें आहे. खरें पंचांग पाहिजे असेल तर तें त्याशीं सर्व बाबतींत जुळलें पाहिजे. चुकीचें पंचांग कोणतें पाळावें, हें ज्याचें त्यानें ठरवावें. लोकांत ज्या अनेक कारणांनी नेहमी फूट पडत असते, त्यांत हें आणखी अेक कारण झालें आहे. टिळक पंचांगापासून कांही फायदा तर नाहीच, पण हें नुकसान मात्र झालें आहे. २. तारीख हा शब्द अिंग्रजी नाहीं, फारसी आहे. तो नको तर अिंग्रजी महिना तरी कशाला पाहिजे? वास्तविक अिंग्रजी महिना देखील अिंग्रजी नाहीं, तो यूरोप–अमेरिकेंत सर्वत्र चालू आहे. परकीय कांही नको असेल, तर आपणही बंगाली पत्रांप्रमाणें महिने देखील आपल्या पंचांगांप्रमाणें घालावे. त्यांत भांडणें असल्यामुळे बराच घोटाळा होईल, पण अशा भांडणांतच आपल्याला आनंद वाटतो. म्हणूनच कोणतीही अेक पद्धत आपल्याकडे अंमलांत येत नाही. ही अक्कल येईल तेव्हां खरी, तेथपर्यंत हें असेंच चालायचें. **सं.**

१. परवांच मुंबईत कै. वामनराव जोशी स्मृतिदिन पाळला गेला. कै. जोशी यांच्यापेक्षां जास्त बुद्धीचे साहित्यिक महाराष्ट्रांत जन्मले नव्हते काय? कै. डॉ. श्री. व्यं. केतकर या महान् बुद्धिवंताचा स्मृतिदिन कोठेही पाळला जात नाही. किंवा कै. वि. का. राजवाडे, महात्मा फुले वगैरेंची

साहित्यिकांना ओळखच नाही ? कै. जोशी यांचा स्मृतिदिन पाळण्यांत मुंबईच्या साहित्यिकांचे सोंग होतें की ढोंग ? २. कै. आगरकरांची बुद्धिवादी परंपरा महाराष्ट्रांत पुढें चालवणारे अेकटे वामनरावच होते, असें आचार्य भागवत म्हणाले. अेखाद्याला श्रेष्ठ लेखतांना दुसऱ्यांना उगाच कमीपणा आणला जातो, याची दखलगिरी आचार्यांना नसावी हें आश्चर्य आहे. त्यांचे म्हणणें खरें तर कै. गोपाळराव गोखले, महर्षि अण्णासाहेब कर्वे, यांनी महाराष्ट्रांत कांहींच का कर्तबगारी केली नाही ? बुद्धिवादी लोकांमधें वामनरावजींना मागे टाकणारे कै. डॉ. केतकर, वि. कां. राजवाडे होऊन गेले नव्हते काय ? या सर्वांनी आपापल्याला योग्य वाटणारीं सामाजिक व राजकीय कार्यें हाताळलीं आहेत. वामनरावजींनी तसें कांही केलें नाही हे भागवतांना कबूलच आहे. डॉ. केतकरांच्या व राजवाड्यांच्या लिखाणाने भागवतांच्या जीवनावर कांहीच परिणाम झाला नाही ? ३. सोंग आणि ढोंग यांत फारसा फरक नाही. सोंगाच्या सातत्याचा परिणाम नेहमी ढोंगांतच होतो. ४. धर्म, श्रद्धा, गूढवाद, वगैरे शब्दांना जुने अर्थ आहेत. आचार्य भागवत या शब्दांना नवीन अर्थ लावून ते प्रचारांत आणूं पहात आहेत. असें कां करावें ? त्यांचे विचारवाहक असे नवीन शब्द त्यांना सांपडत नाहीत असें दिसतें. ५. ते म्हणतात, ' मानवी जीवनाला श्रद्धा लागते. ' मला तसें वाटत नाही. लागली तर महत्वाकांक्षा लागते, माणसापुढें ध्येय असावें लागतें. श्रद्धा म्हणजे ध्येय की काय ? लुई पाश्चर, डार्विन, आअिन्ष्टाअिन, मॅडम क्युरी, किंवा अणुबॉंबसंशोधक यांच्यापुढे श्रद्धा होती ? मनुष्य कार्यप्रवण होतो तो ध्येयामुळे होतो, मग तें बरें अथवा वाअीटही असूं शकतें. श्री. भागवतांचीं वरील विधानें अतिव्याप्त, अपर्याप्त, अशीं वाटत नाही काय ? ते उत्तम वक्ते आहेत, त्यांचीं व्याख्यानें सर्वत्र होतात. आपल्या श्रोत्यांच्या मनांत ते अर्धसत्यें कोंबूं लागले आहेत, म्हणून हे प्रश्न विचारले आहेत. **अेक साहित्यिक**

उ. १. स्मृतिदिन कोणाचा पाळावा यासंबंधी कांही नियम नाही.

अेखादा मनुष्य लोकप्रिय असला, किंवा त्याच्या वतीने उचल करणारे कांही लोक निघाले, म्हणजे स्मृतिदिन पाळला जातो, कारण त्याला विरोध करण्याची कोणाचीच छाती नसते. नाटककारांपैकी फक्त गडकऱ्यांचाच स्मृतिदिन पाळला जातो, यावरून ते सर्वांत श्रेष्ठ नाटककार ठरतात, असें विधान अेका वक्त्याने केलेलें आठवतें. तें अर्थातच हास्यास्पद आहे. २. आगरकरांच्या बुद्धिवादी परंपरेसंबंधी आमचें मत याच अंकांत अितरत्र दिलें आहे. गोपाळराव गोखले बुद्धिवादी नव्हतेच, डॉ. केतकरही नव्हते. महर्षि कर्वे यांनी अशा प्रकारचें लिखाण केलेलें नाही. राजवाड्यांनीही केलें असेल असें वाटत नाही. ते बुद्धिवादी होते की काय हें माहीत नाही. वामनराव जरी अर्धवटच बुद्धिवादी होते, तरी या अितरांपेक्षा त्यांनी बुद्धिवादाला जास्त पाठिंबा दिला होता. मात्र त्यांनी आगरकरांची परंपरा चालू ठेवली हें म्हणणें हास्यास्पद आहे. ५. आचार्य कशाला श्रद्धा म्हणतील हें सांगवत नाही. बुद्धिवाद्यांना सुद्धां श्रद्धा असते असें ते म्हणतातच. भागवतांसारख्या वक्त्यांपासून नेहमींच सावध रहावें लागतें. पण सामान्य श्रोत्यांना हें अर्थातच कळत नाही. त्यांच्या भाषणाच्या वेळीं आपण उच्च वातावरणांत पोहत आहोंत असें वाटणारे अेक गृहस्थ आम्हाला भेटले होते. प्रचारकांचा धंदाच हा असतो की 'येन केन प्रकारेण' आपलें म्हणणें खरें ठरवायचें. बुद्धिवाद्यांना तसें करणें जमत नाही. त्यांना अधिक कांटेकोर विचार करण्याची संवय असते. यामुळे आमच्यासारखे लोक कोणत्याही पक्षांत जाऊं शकत नाहीत, कारण कोणत्याही पक्षांत प्रामाणिक विचाराला परवानगी नसते. **सं.**

---

# शारदेचें पत्र

भाषाशुद्धीवर व्याख्यानें देतांना किंवा लेख लिहितांना पुष्कळ लोक स्वतःचेंच कसें हंसें करून घेतात हें पाहण्यासारखें असतें. भाषाशुद्धीचें

तत्व मलाही मान्य आहे, पण जे शब्द मराठींत संस्कृतमधून न येतांना अितर भाषांतून येऊन रूढ झालेले असतात, ते कितीहि प्रयत्न केले तरी बंद होणें शक्य नसतें. उदाहरणार्थ 'पास' हा शब्द अिंग्रजींतून आला खरा, पण तो नुसता प्रचारांत येऊन थांबला नाही, तर त्याला मागें 'ना' जोडून त्यापासून 'नापास' हा शब्द तयार होऊन रूढ झाला. अशा शब्दांच्या मागें न लागणेंच बरें. उदाहरणाथ 'तिकीट' हा शब्द अिंग्रजींतून आला खरा, पण तो आतां कधीं नाहीसा होईलसें दिसत नाही. तोही नुसता येऊन थांबला नाहीं, तर कागदाच्या लहानशा तुकडयाला तिकीट म्हणायचें असें ठरवून टपालखात्याच्या नियमाप्रमाणें पत्राचें हंशील देण्याकरतां जे कागदाचे तुकडे पत्रांना चिकटवावे लागतात त्यांनाही आपण पोस्टाचीं तिकिटें म्हणूं लागलों. हा अिंग्रजी शब्दाचा उपयोग ऐकून अिंग्रजाला हंसूच येअील, पण तो मराठींत राहणारच. कित्येक जण भाषा-शुद्धीच्या उत्साहाच्या भरांत स्वतःच्या अज्ञानाचें प्रदर्शन करतात. याचें ताजें उदाहरण म्हणजे डॉ. ना. दा सावरकर यांनीं ४ जुलैच्या प्रभातच्या अंकांत या विषयावर एक लेख लिहून अशुद्ध लेखनाचें उदाहरण म्हणून 'कुटिर' हा शब्द बरोबर, आणि कित्येक लोक 'कुटीर' लिहितात म्हणून खेद प्रदर्शित केला आहे. संस्कृतमध्यें 'कुटिर' आणि 'कुटीर' अशी दोन्ही रुपें सांपडतात, हें डाक्तरमजकुरांना माहीत नसावें हे उघड आहे, पण दुसऱ्याला उपदेश करण्यापूर्वी स्वतःची खात्री करून घेणें कठिण नाही. अमुक शब्द चूक ठरवण्यापूर्वी कोशांत पाहणें कठिण नसतें.

संयुक्त महाराष्ट्राबद्दल आतांपर्यंत बरीच चर्चा झाली आणि येथें शंकर-राव देवांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेंत वऱ्हाडांतल्याही कांहीं वक्त्यांनीं लाजेकाजेने आपली मिळमिळीत संमति दर्शविली होती. अकोल्याच्या मातृ-भूमीच्या संपादिका प्रमिलाबाअी ओक यांनीं तर असेंही बोलून दाखवलें की कित्येक वर्षांपूर्वी त्यांनीं वऱ्हाडने महाराष्ट्रांत सामील होऊं नये असें मत व्यक्त केलें असल्यामुळें त्यांना या सभेंत मुद्दाम संमति देण्याकरतां पकडून

आणलें होतें. वऱ्हाड हा प्रांत संपन्न आहे, त्याच्या संपत्तीचा फायदा दरिद्री महाराष्ट्राला मिळेल की काय, हीच भीति त्यांनीं मागें बोलून दाखवली होती आणि येथें संमति दिल्यानंतर आतां त्या पुनः तीच भीति व्यक्त करीत आहेत. अर्थात् त्या आपल्या पत्राच्या मालक नाहींत, तेव्हां हें मत त्यांचें नसून त्यांच्या बोलवित्या धन्याचें असणें शक्य आहे, परंतु तें समजायला मार्ग नाहीं. आपल्या संपत्तीचा फायदा दुसऱ्याला मिळाला तर केवढा अनर्थ होअील, असें श्रीमंतांना नेहमीच वाटतें, तेव्हां यांत मोठेंसे आश्चर्य नाहीं. पण या मुख्य कारणाचें महत्व अितरांना वाटणार नाहीं, म्हणून त्यांनीं भरीला दुसरेंही कारण असें सांगितलें की वऱ्हाड व मध्यप्रांतांतल्या लोकांची अेकंदर संस्कृतिच वेगळी, तेव्हां त्यांना जबरदस्तीने अेकत्र आणलें तरी त्यांचें कधींच पटणार नाहीं. असेंच कारण जिनाने पाकिस्तानची मागणी करतांना सांगितलें होतें, तेव्हां हें कारण यशस्वी होतें असा पुरावा आहे. या फुटीर वृत्तींतून संयुक्त महाराष्ट्र बनणार कसा ?

महाराष्ट्राचा भगवा झेंडा हेंच हिंदुस्थानचें राष्ट्रीय निशाण मानावें, असें मत बॅ. सावरकरांनी दिलें आहे आणि अशा तारा आणखीही अनेकांकडून गेल्या. आतां महाराष्ट्राचें निशाण अितरांनीं का मान्य करावें असें कोणी म्हणेल, म्हणून त्या भगव्या झेंड्यांत प्रगतिदर्शक चक्र घालावें, अशी एक पुस्ती या लोकांनी जोडलीं आहे. मला वाटतें चक्र हें प्रगतीचें निदर्शक होऊंच शकत नाही, कारण किती तरी प्रकारचीं चाकें जागच्या जागींच फिरत असतात आणि शिवाय ' नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ' यांतही तेंच सांगितलें आहे. शिवाय महाराष्ट्राने तरी निशाणाकरतां भगवा रंग कां घेतला ? शिवाजीच्या वेळेला महाराष्ट्रांत साधूंचें प्रस्थ फार होतें आणि रामदासस्वामींच्या उपदेशाने शिवाजीनें भगवा रंग आपल्या निशाणाला घेतला असें म्हणतात. हें साधूंचें बंड आम्हांला नको आहे, तेव्हां भगवा रंग असूं नये असें मला वाटतें. अर्थात् कॉंग्रेसच्या हुकुमी बहुमतामुळें या भगव्या रंगाचा बहुधा कोणी विचारच करणार नाही आणि कॉंग्रेसचा चरखा-

युक्त ध्वजच शेवटीं राष्ट्रीय निशाण म्हणून ठरेल, हा मोठा धोका आहे. असला बावळट झेंडा मला तरी नको आहे. हा गांधींचा बावळटपणा हिंदुस्थानांत कायम न झाला तर बरा. हिंदुस्थानांत जर अनेक स्वतंत्र घटक रहायचे असतील, तर अमेरिकेच्या धर्तीवर अेकादें निशाण ठरवणें बरें. शिवाय पाकिस्तान आणि हिंदुस्थान कधींकाळीं अेकत्र होण्याचा प्रसंग आलाच तर हा निशाणाचा प्रश्न अर्थातच पुनः उपस्थित होईल. (सध्यातरी आतां निशाण ठरलें आहे.)

शैक्षणिक नाटकावरचा कर रद्द होणार आहे असें म्हणतात, पण फक्त काहीं नाटकांवरचाच कर रद्द करायचें ठरवून वशिलेबाजीला जागा करून ठेवण्यापेक्षां सगळ्याच नाटकांवरचा कर रद्द करणें मला बरें वाटतें. हल्ली नाटकें जवळजवळ नाहीशींच झालीं आहेत, तेव्हां सिनेमांच्या मानाने नाटकांतून सरकारला फारसा फायदा होत असेलसें वाटत नाही. तेव्हां नाटकें जर पुन्हा पूर्ववत् व्हायला पाहिजे असतील, तर कर अजांबात रद्द करणें हा त्याला अेक उपाय आहे. सिनेमाचें अेक आकर्षण म्हणजे तिकिटांचे स्वस्त दर ठेवणें परवडत नाही, कारण नाटकांत प्रत्येक प्रयोगांत तितक्या माणसांना पुन्हा काम करावें लागतें. सिनेमासारख्या नाटकाच्या प्रयोगाच्या शेंकडों प्रती काढून वांटतां येत नाहीत. नाटकांना विशेष सवलत द्यायला हें कारण पुरेसें आहे असें मला वाटतें. पण प्रजेला जबरदस्तीनें नीतिमान बनवण्याकरतां सरकारला अितका खर्च येतो, कीं त्याकरतां जबरदस्त कर जनतेवर लादावे लागतात. म्हणजे दारूबाजांची नीति राखण्याकरतां सदाचारी जनतेला दंड होतो आणि दारूबाज ताळ्यावर येत नाहीतच हें वेगळें. ते कोठून ना कोठून तरी दारू मिळवतात, न मिळाल्यास जें कांही कोणी दारू म्हणून विकील तेंच पितात आणि त्यामुळे जीव धोक्यांत आला तरी त्यांना परवा नसते. पण आम्ही केवढे नीतिमान आहों अशी सरकारला बढाअी मारतां येते, हा काय तो या सगळ्या खटाटोपाचा फायदा आहे. नीतिबाज सरकारला आणखी काय पाहिजे?

'ध्रुव' मासिकाच्या जुलैच्या अंकांत अेका वानर जोडप्याचें चित्र देऊन त्याला मनुष्यजातीचे पूर्वज असें नांव दिलें आहे आणि त्याच्या खालीं 'यांना संपूर्ण स्वातंत्र्य, शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, भरपूर फळें, विश्रांति, मनःस्वास्थ्य, अित्यादिकांचा लाभ झाला तरी त्यांच्या मेंदूची वाढ झाली नाही किंवा त्यांना दीर्घायुष्यही लाभलें नाही!' असे उद्गार काढले आहेत. याच अंकांत वदतोव्याघाताने विनोद कसा निर्माण होतो, याचीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत, त्यांतच कदाचित् हे उद्गार घालावे लागतील. हे जर मनुष्याचे पूर्वज, तर यांच्याच मेंदूची वाढ होऊन माणसे झालीं असा त्याचा अर्थ होतो. मग मेंदूची वाढ झाली नाही कशी? अर्थात् एक व्यक्ति लहानपणीं वानर आणि मरण्यापूर्वी मेंदूची वाढ होऊन त्याचा मनुष्य झाला, हें अशक्य आहे. पण याच प्राण्यांत मेंदूची वाढ आणि इतर कांही फरक होऊन त्यांचीं माणसे झालीं, हाच अर्थ त्यांना मनुष्याचे पूर्वज म्हटल्याने निघतो. वास्तविक जे खरोखर मनुष्याचे पूर्वज होते, तें आज अस्तित्वांतच नाहीत, कारण त्यांचीं माणसें झालीं! ज्या वानरांचीं चित्रें दिलीं आहेत, ते बऱ्याच अंशीं त्या पूर्वजांसारखे आहेत, ते प्रत्यक्ष पूर्वज नव्हत. शिवाय अरण्यांत राहणाऱ्या प्राण्यांना खरोखर विश्रांति किंवा मनःस्वास्थ्य केव्हांच लाभत नाही. त्यांना हिंस्र पशूंची नेहमीच भीति असते. वानर झाडांवर चढत असले किंवा झोप घेत असले, तरी तेथेही त्यांच्यापर्यंत पोंचणारे सर्पांसारखे प्राणी असतातच. आणि मनुष्याला आजतागायत सर्पांची जी मनस्वी भीति वाटते, तिचें कारण हेंच आहे. ती भीति कांहीं अंशीं आनुवांशिक आहे.

याच अंकांत मुखपृष्ठावरील चित्रांवर माझ्यांना आपल्या नवीन मासिकांत घेतलेल्या आक्षेपासंबंधीं मजकूर आहे. 'रंगीबेरंगी व खुमासदार मुखवटे' छापण्याचा आग्रह माझ्यांना मूर्खपणाचा वाटतो, तरीही त्यांच्या मासिकावर स्त्रीचेंच चित्र आहे. तें मी पाहिलें नाहीं, तेव्हां तें कदाचित् खुमासदार नसून किळसवाणें असेल. 'ध्रुव' कारांनी त्यांना बजावलें आहे की 'ध्रुव' आणि 'चित्रमय जगत्' यांनीं गेल्या तीनचार महिन्यांपासून मुखपृष्ठावर

चित्रें देण्याची प्रथा सोडून दिली आहे. ध्रुवाच्या या अंकावर रंगीबेरंगी कापडासारखें नकसकाम आहे. तें ठीक दिसतें, पण माणसांच्या चित्रांपेक्षा त्यांत कांहीं अधिक सौंदर्य आहे असें मला तरी वाटत नाहीं. अितर लोकांना जें सुंदर दिसतें ते माझ्यांना तसें दिसत नाहीं, याला अिलाज नाहीं. ही वैयक्तिक आवडानिवड आहे. पण पुष्कळ वाचकांना चित्रें आवडतात, म्हणूनच संपादक आणि प्रकाशक तीं देतात हें उघड आहे. अर्थात् मुखपृष्ठांत जितकें वैचित्र्य असेल तितकें बरेंच, त्यांत काहीं बिघडत नाहीं. पण माणसांच्या चित्रांत कांहीं मूलभूत दोष आहे असें मला वाटत नाहीं. रविवर्म्याचीं चित्रें भिंतींवर लावलेलीं जर चालतात, नव्हे, पुष्कळांना आवडतात, तर मुखपृष्ठांवरच कां चालूं नयेत ?

तुझी **शारदा**

---

# फ्रेंच शाळांत लैंगिक शिक्षण

गेल्या जानेवारीच्या २० तारखेला पॅरिस येथील विश्वविद्यालयांत कांहीं अिंग्रजी व फ्रेंच तज्ज्ञांनी अेकत्र बसून सार्वजनिक रीतीने वरील विषयाची चर्चा केली. या चर्चेची ध्वनिमुद्रा तयार करून ती फेब्रुआरी महिन्यांत नभोवाणीवरून अैकवली. या श्रोत्यांत फ्रान्सचे शिक्षणमंत्री होते, त्यांनीं ताबडतोब हें शिक्षण कशा स्वरूपांत देतां येअील हें ठरवण्याकरतां अेक समिति नेमली.

शेंकडा ९० आअीबाप या विषयाकडे दुर्लक्ष करतात आणि परिणामीं मुलांना भलत्याच मार्गानें यासंबंधी माहिती ( व तीही चुकीची ) मिळून त्यांचें पुष्कळ वेळां जन्माचें नुकसान होतें, अशी हल्लीची स्थिति आहे. या समितीवरच्या अेका डाक्तराने दोन मुलींची उदाहरणें सांगितलीं, त्यांना यासंबंधी संपूर्ण अज्ञान होतें आणि जेव्हां लग्नानंतर स्त्रीपुरुषसंबंध हा काय प्रकार आहे हें त्यांना अकस्मात् समजलें, तेव्हां त्यांना अेवढा धक्का बसला की त्यांची वाचा बंद झाली ! तसेंच एका ३५ वर्षांच्या तरुणाला

यांतलें कांहीच माहीत नसल्यामुळें व त्याने लग्न केल्यावर तो नपुंसक ठरल्यामुळे बायकोने कोर्टाकडून घटस्फोट मिळवला. पण तरीही त्याला त्यांतलें कांही न कळल्यामुळे त्याने पुन्हा लग्न केलें आणि पुन्हा घटस्फोटाचा खटला त्याच्या विरुद्ध गेला. अर्थात् तो खेडवळ असल्यामुळे कोर्टांत काय झालें तें त्याला कळलें नाही.

या परिस्थितीचीं कारणें अशीं की शिक्षक यासंबंधी कांही सांगत नाहींत. हृदय, फुप्फुसें, प्लीहा, वगैरे भागांबद्दल भरपूर माहिती देतात, पण जननेंद्रियांसंबंधी अेक अक्षर नाही. समितीवरच्या अेका डाक्तरानें असें सुचवलें की कुत्र्यामांजरांची प्रसूति लहान मुलांना मुद्दाम दाखवावी.

दुसरें कारण कुटुंबांत स्वच्छतेचा फाजील बाऊ केला जातो. उदाहरणार्थ मूल अंथरुणांत मुतलें, तर त्याला घाणेरडें वगैरे विशेषणें लावून आया रागें भरतात. यामुळें आपण कांहीं भयंकर पाप केलें आहे अशी त्यांची भावना होते आणि त्यांना आपल्या शरीराची लाज वाटूं लागते.

तिसरें कारण म्हणजे बायबलांत स्त्रीपुरुषसंबंधाला मनुष्याचें "मूळचें पाप" म्हटलें आहे. आणि त्यामुळें अिश्वराचा कोप होऊन अधःपात झाला असें सांगितलें आहे. ही पापाची कल्पना समूळ नाहीशी झाली पाहिजे. पण धर्मोपदेशक या गोष्टीवर अजूनहि भर देतात. आणि स्त्रिया व पुरुष अेकमेकांचे शत्रू आहेत असें शिक्षण लहानपणापासून मिळतें. चीनमध्यें यासंबंधी लज्जेची भावना नसते. त्यामुळें तेथील लोकांची मनें या बाबतींत विकृत झालेली नसतात, असें प्रो. नीडॅम यांनी सांगितलें.

हें शिक्षण कसें द्यावें, केवळ आअीबापांना या गोष्टी समजावून सांगाव्या की त्या शिक्षणक्रमांत घालाव्या, याबद्दल मतभेद पुष्कळच आहेत. पण कांहीं धर्माचा धंदा करणारांनीही त्यांत मन घातलें आहे, तेव्हां यांतून कांहीतरी निष्पन्न होईल असें वाटतें.

---

# स मा ज स्वा स्थ्य

## वर्गणीची माहिती

हें मासिक दर १५ तारखेला प्रसिद्ध होतें. वार्षिक वर्गणी तीन रुपये, व्ही. पी. ने सवातीन. पोर्तुगीज प्रांतांत किंवा परदेशीं व्ही. पी. नाही. हिंदुस्थानाबाहेर साडेतीन रुपये किंवा पांच शिलिंग. मनीऑर्डर केल्यास चार आणे वांचतील. अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हास मिळाली पाहिजे. पुणें येथील ग्राहकांनी ६९-१, लॉ कॉलेज रोड, येरंडवणें येथें वर्गणी भरल्यास चालेल.

**राअिट अेजन्सी,** १३ नवी भटवाडी, मुंबई - ४

## आमचेकडे मिळणारा माल

| | |
|---|---|
| **लॅम्बट डच कॅप,** आकार ५५ ते ७५, प्रत्येकीं | रु. ५ |
| **उभट कॅप** ( देशी ) लहान, मध्यम किंवा मोठी, | रु. १॥ |
| **राअिट कॉंट्रॅसेप्टिव्ह जेली,** | रु. ३॥ |
| **पुरुषांकरतां पिशव्या,** | ४ आणे, ८ आणे, १ रुपया |
| **कषायचूर्ण,** ( योनिमार्ग धुण्याकरतां ) | बाटलीस अडीच रुपये |
| **राअिट हेअर लोशन,** ( कुंतलरक्षक ), | बाटलीस तीन रुपये |
| **कामोत्तेजक नंबर १,** (प्रकृतीकरतां) | बाटलीस चार रुपये |
| **राअिटयूब,** ( रोगप्रतिबंधाकरतां ) | रु. १ |

**राअिट अेजन्सी,** १३ नवी भटवाडी, मुंबई–४.

Registered No. B 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख. ५आणे.

२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], चौथी आवृत्ति किंमत रु. ४, ट. ख. ६ आणे.

३. संततिनियमन [सचित्र], ९ वी आ. १। रु. ट. ख. ४आ.

४. गुप्त रोगांपासून बचाव, ४थी आ. रु. १, ट. ख. ४आणे.

५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,

भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.

भाग २ रा [वर्षें ४-५-६], किं. २-०-०, ट. ख. ५आ.

६. त्वचेची निगा. किं. ८ आ., ट. ख. ४ आ.

७. गुरुबाजी (नाटक) किं. ८ आ., ट. ख. ४ आणे

८. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ५ आ.

९. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ४ आ.

१०. न्यायाचा शोध ( नवीन सामाजिक नाटक ) किंमत १ रु., ट. ख. ४

११. पॅरिसच्या परी, किं. ३ रु., ट. ख. ५ आणे.

## डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५आ.

२. मूळव्याध. किं. ४ आ.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, १०३, ताडदेव रोड, मुंबई नं. ७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई